# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

## राज्यशास्त्र विभाग

6:55 ··· 85%
Normalize a disturbed bowel function BUY NOW

सकाळ

# लोकशाही, समतेसाठी संविधान दिनाची गरज

### डॉ. जरे यांचे मत; राजगुरू महाविद्यालयात कार्यक्रम

**राजगुरुनगर, ता. २९ :** देशातील स्वातंत्र्य, बंधुभाव ही मूल्ये आणि राष्ट्राची एकात्मता बळकट करण्यासाठी संविधान दिन साजरा करण्याची गरज असून, तो लोकोत्सव व्हायला हवा, अशी भावना प्राचार्य डॉ. एच. एम. जरे यांनी व्यक्त केली. हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित संविधान दिनानिमित्तच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

या प्रसंगी उपप्राचार्य, डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे, प्रबंधक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते. भारताचे संविधान आणि त्यातील मौलिक तत्त्वे, संवैधानिक हक्क आणि कर्तव्ये यांची विद्यार्थ्यांनी माहिती करून घ्यावी, असे आवाहन या प्रसंगी बोलताना डॉ. शिंदे यांनी केले.

भारतीय संविधानातील तत्त्वांचा प्रसार व प्रचार करण्यासोबतच विद्यार्थ्यांना संविधानाची पुरेशी ओळख व त्यातील तत्त्वांविषयी जागृती करून देण्यासाठी संविधान दिन साजरा करण्यात आल्याचे डॉ. सोनवणे यांनी या वेळी सांगितले.

संविधानाच्या प्रास्ताविकाचे वाचन मयूर होले याने केले. रोषण पानमंद याने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. प्रा. सदाशिव उळागड्डे यांनी आभार मानले.



**राजगुरुनगर (ता. खेड) : राजगुरू महाविद्यालयात संविधान दिनानिमित्तच्या कार्यक्रमात बोलताना प्राचार्य डॉ. एच. एम. जरे.**

# राजगुरू महाविद्यालयात संविधान गौरव दिन उत्साहात

राजगुरुनगर, (वार्ताहर) : देशातील लोकशाही, समता, स्वातंत्र्य, बंधुभाव ही मूल्ये आणि राष्ट्राची एकात्मता बळकट करण्यासाठी संविधान दिन उत्साहात साजरा करण्याची गरज असून तो लोकोत्सव व्हायला हवा अशी भावना प्राचार्य डॉ. एच.एम. जरे यांनी व्यक्त केली. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात राज्यशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित संविधान दिनानिमित्तच्या कार्यक्रमात बोलत होते.

या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. व्ही.डी.कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. कैलास सोनवणे, प्रबंधक कैलास पाचारणे व प्राध्यापक उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख